# डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनला आंतरमहाविद्यालयीन योगासन स्पर्धेत अजिंक्यपद



अमरावती दि. ७ : स्व. छगनलाल कड्डी कला महाविद्यालय येथे २६ ते २८ नवंबर २०२२ दरम्यान झालेल्या आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन अमरावती च्या मुले व मुलींच्या चमूंनी यांनी अजिंक्यपद पटकविले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ अमरावती द्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन योगासन स्पर्धे मधे ४० पेक्षा जास्त महविद्यालयांतिल १५० हुन जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोन्दविला ज्या मधे सर्वसाधारण चमु (मुले व मूली) विजेतेपद श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन अमरावती लामिळाल.

एका चमु मधे सहा खेळाडू असतात त्यांना प्रत्येकी ५ अनिवार्य आसन व ४ पर्यायी आसन करावे लागतात. आसनाची काठिन्यपातळी व स्थिरता बघून प्रत्येक आसनाला १० असे एकून १०० गुण ५ परिक्षकांन कडून दिले जातात त्यामधे सर्वात जास्त व सर्वात कमी गुण कपात करुन उर्वरित ३ परिक्षकांचे गुणांची बेरीज करुन त्यांचे सरासरी काढून गुण दान केले जाते.

डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन च्या मुलांच्या चमु मधे प्रशिक्षक प्रा. प्रतीक पाथरे सोबत खेळाडू १. ऋषिकेश चकुले ( एम ए योगशास्त्र) २. सुनीलकुमार गोटा ( बी पी ई एस ) ३. योगेश पालीवाल ( एम ए योगशास्त्र) ४. हर्ष त्यागी ( बी पी ई एस ) ५. करण भालेराव ( बी पी ई एस ) ६. वैभव येरने (एम ए योगशास्त्र) अतिरिक्त खेळाडू मध्ये ७. सूरज वैद्य ( बी ए योगशास्त्र) ८. आश्विन धर्मे ( बी पी ई एस) ९. प्रसाद इंगोले ( एम ए योगशास्त्र) तर मुलींच्या चमु मधे प्रशिक्षक डॉ सुनीता केने खेळाडू १. साक्षी कडू ( एम ए योगशास्त्र) २. : मिताली गंगथडे ( एम ए योगशास्त्र) ३. चेतना देशमुख ( बी ए योगशास्त्र) ४. किरण भुजाडे ( एम ए योगशास्त्र) ५. सोनाली शर्मा ६ आरती एकरे ७. रुपाली पाथरे यांनी सहभाग नोंदवून १५०० पैकी क्रमशः १३६० व ११२० गुण मिळवून अजिंक्यपद प्राप्त केले.

पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, डॉ सुरेशराव देशपांडे सर, डॉ रामेशरावजी गोडबोले सर डॉ माधुरी चेंडके मॅडम, डॉ अरुण खोडस्कर सर यांच्या कृपा आशीर्वादने व प्राचार्य डॉ उदय मांजरे सर, उप प्राचार्य डॉ श्रीनिवास देशपांडे, योग विभाग प्रमुख डॉ सुनील लावडे, योग प्रशिक्षक श्री नितिन काळे सर श्री प्रवीण नासाने श्री प्रमोद शिरभाते यांच्या मार्गदर्शनमधे हे यश प्राप्त झाले. सर्व योगपटूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विविध सामाजिक उपक्रमाने डॉ. लक्ष्मीकांत राठी यांचा वाढदिवस साजरा





अमरावती दि. ७ : प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ आणि मेंदू तज्ज्ञ डॉ. लक्ष्मीकांत राठी यांनी आपला वाढदिवस अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडत साजरा केला.

समाज माणसाला ऐश्वर्य, प्रतिष्ठा आणि सन्मान देतो, पण या जगात काही मोजकेच लोक आहेत जे आपल्या सामाजिक जबाबदारीने ही गोष्ट समाजाला परत करतात. दरवर्षी डॉ.लक्ष्मीकांत राठी यांच्या वाढदिवसानिमित्त समाजकार्याचा झेंडा फडकवला जातो. ज्याद्वारे अनेक गरजू लोक आणि संस्थांना मदत केली जाते. यंदाही याच परंपरेनुसार डॉ. लक्ष्मीकांत राठी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

डॉ.लक्ष्मीकांत राठी यांच्या हस्ते श्री .गुरमाळे, श्री.टेकाडे, श्री.बेतुले आणि जतीन कोसे यांना चार सायकल देण्यात आल्या. त्यानंतर लायन्स क्लब अमरावती प्रीमियमच्या वतीने जेवडनगर शाळेत बांधण्यात येणाऱ्या शौचालयासाठी ११ हजारांची आर्थिक मदत करण्यात आली. सीमा सतीश श्रीवास यांना शिलाई मशीन देण्यात आले. मीनल तलवारे आणि आयुष विघे या होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आली.

सकाळी आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर लायन्स क्लब अमरावती प्रीमियमचे अध्यक्ष रतनदीप सिंग बग्गा, लायन्स क्लब अमरावती प्रीमियम क्वीन्सच्या अध्यक्षा डॉ.शिल्पा दारा, भगवानदास जी राठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.निक्कू खालसा यांनी केले. डॉ.लक्ष्मीकांत राठी यांनी आपल्या भाषणात समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचून त्यांची सेवा करून त्यांना मिळणारा आनंद आपल्या जीवनात आणण्याची विनंती उपस्थितांना केली.

सकाळपासूनच डॉ. लक्ष्मीकांत राठी यांना शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी झाली होती, त्यात रतनदीपसिंग बग्गा, सचिव हर्षद जावरकर, कोषाध्यक्ष सारंग राऊत, डॉ. निक्कू खालसा, डॉ. आशिष साबू, प्रवीण ढवळे, डॉ. पंकज घुंडियाल, राजेंद्र जाधव, डॉ. प्रकाश कोठारी, सतवंतसिंग मोंगा, दीपक असरानी, गोपाल पनपलिया, संजय देशमुख, मनोज भेंडे, निकुंज राजा, रवींद्रसिंग सलुजा, नवल उबोवेजा, दिलीप पोपट, डॉ.आशिष माशंकर, डॉ.नितीन राठी, पुरुषोत्तम राठी, अरुण जेवळे, दिवंगत डॉ. , शैलेश पटेल, महेश हेमराजानी, सारंग राऊत, दीपक जाजू, अनिल काकरनिया, हनी अरोरा, अनूप भूत, विनोद अग्रवाल, डॉ. अनुकुल पटेरिया, डॉ. सतीश गुप्ता, श्रीकांत टेकाडे, सुशील सारडा, एड. अनिरुद्ध लड्ढा, गुरविंदर सिंग मोंगा, गिरीश खत्री, मनीष दारा, डॉ.अतुल पाटील, हर्षद जावरकर, डॉ.धीरज सवाई, डॉ.गोपाल बेलोकर, डॉ.आशिष डगवार, डॉ.अमित जाजू, शशी खत्री, ऋषभ चांडक, पंकज छाबरा, डॉ. राजेश छाबरा, राजेंद्रसिंग छाबरा, डॉ. रोहन देशमुख, धवल शहा, विनोद राठी, नमनदीपसिंग सलुजा, रोहित खुराना, संकेत भामकर, संकेत महल्ले, विवेक खारपे, रविश सरवैया, आनंद चौधरी, डॉ. सौरभ लांडे, अभिषेक राजा, डॉ. दारा, डॉ. सरिता खत्री, गगनदीप खालसा, डॉ. कृष्णा पटेरिया, निमिषा साबू, कनिष्क हबलानी, छाया दांदळे, कुमुदिनी ढोबळे, उज्वला सारडा, पूजा वालेच्छा, अंजली खत्री, निशा भरणी, डॉ. संध्या कोठारी, डिंपल खुराना आदी उपस्थित होते.

# लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! पुस्तक प्रकाशित



मुंबई दि. ७ : डॉ. मोहन दिवटे लिखित लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! या पुस्तकाचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांच्या हस्ते प्रकाशगड येथील मुख्यालयात आज प्रकाशन करण्यात आले.

डॉ. दिवटे यांनी लिहिलेले लढता लढता कोरानाशी.. रक्ताळल्या प्रकाशवाटा..! हे पुस्तक (कादंबरी) महावितरणच्या सकारात्मक कामगिरीचे प्रदर्शन करणारे असून रामभाऊ हा गुणी जनमित्र या कादंबरीचा नायक आहे. हे पुस्तक वान्या पब्लिकेशन्स कानपूरद्वारे प्रकाशित करण्यात आले आहे.

या प्रकाशन कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे यांनी केले. या कार्यक्रमास संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे, संचालक (वित्त) श्री. रविंद सावंत, संचालक (प्रकल्प/मानव संसाधन) श्री. प्रसाद रेशमे, लेखक डॉ. दिवटेसह सर्व कार्यकारी संचालक व सर्व मुख्य अभियंते व विभागप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. दिवटे हे महावितरणच्या लातूर परिमंडल येथे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

# मेळघाटच्या जंगलाला लागले ग्रहण

## बेशुद्ध उद्मांजर व मृत बकरी सापडली : सायबर सेलचे पथक सेमाडोहात मुक्कामी

धारणी दि. ७ : सेमाडोह जवळच्या असेरी नावाच्या जंगलात मंगळवारी नर-मादा बिबट्या मृत अवस्थेत सापडले. त्याच भागात दुसर्या दिवशी एक उद्मांजर संशयास्पद अवस्थेत बेशुद्ध सापडले तर जवळच एक बकरी सुद्धा मेलेली सापडल्याने बिबटच्या मृत्युप्रकरणी नव्याने शोधकार्य करण्याची गरज वाढलेली आहे. दरम्यान बुधवारी सायबर सेल (व्याघ्र) पथक घटनास्थळावर पोहचले तर उद्मांजराला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी नागपूर तर मृत बकरी शवविच्छेदनासाठी हरिसालला पाठविण्यात आली.

मेळघाटातील सिपना वन्यजीव विभागातील सेमाडोह रेंजमधील जंगलात मंगळवारी नर-मादा बिबट मृत सापडल्याने एकच दहशत पसरलेली होती. मंगळवारच्या सकाळीच दोघे मरणपावल्याचे समजले होते. माईक्रो विच्छेदनासाठी बिबटचे अवयव भोपाळ लॅबला पाठविण्यात आले असून अहवाल सुद्धा अप्राप्त असल्याने मृत्युचे कारण अज्ञात आहे. सर्पदंशाची शक्यता असली तरी मृत जनावराच्या तोंडातून फेस आल्याचे कारण सुद्धा गुलदस्त्यात आहे. घटनास्थळाजवळ तपास पथकाला कोणतेही संशयास्पद वस्तु सापडलेली नाही. शिकार किंवा विष कालवण्याची पण साक्ष नाही. बुधवारी सापडलेली बकरी पण पूर्ण साबूत होती तर उद्मांजर मात्र संशयास्पदपणे बेशुद्ध सापडले. घटनास्थळाजवळच एक वाहता नाला आहे. मात्र पाणी अडवलेले नसून डोह पण नाही, हे विशेष! उद्मांजर सापडणे अनेक कारणे व प्रश्न उपस्थित करत आहे. मृत बकरी सापडणे सुद्धा तपासाचा विषय आहे. धारणीपासून ५३ कि. मी. अंतरावरील घटनास्थळी आज व्याघ्र अमरावतीचे सायबर सेलच्या पथकाने भेट दिली. सखोल व बारीक चौकशी सुरू आहे.

**मेळघाटात वन्यजीव धोक्यात?**

गेल्या महिन्यात धारणी व हरिसाल रेंजच्या जंगलात दुर्मिळ पिंगळे मृत झालेले होते. आता तर नर-मादाचा जोडा (बिबटे) मरण पावले. दुसर्या दिवशी उद्मांजर बेशुद्ध आढळल्याने मेळघाटात वन्यजिवांना धोक्याचे संकेत मिळत आहे. दुसरीकडे शेत शिवारात पिके नष्ट करणार्या रानडुकरांचे जीवन पण धोक्यात असल्याची गंभीर माहिती आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली



अमरावती दि. ७ : अमरावती येथे जिल्हा क्रीडा अधिकारी विभागातर्फे आयोजित विविध स्पर्धांमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल, अमरावती २ बडनेरा येथील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये बाजी मारली.

शाळेची विद्यार्थिनी कुमारी अनन्या भस्मे हिने हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण विभागातर्फे आयोजित जलतरण आणि डायव्हिंग, शंभर मीटर फ्री स्टाईल स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निश्चित केले. ही स्पर्धा ६ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

२ डिसेंबर २०२२ रोजी लॉन टेनिस असोसिएशन ग्राउंड दीपनगर-१ येथे आयोजित लॉन टेनिस स्पर्धेत जान्हवी गोंडाणे आणि कृष्णा डवरे या शालेय विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. त्याच अनुषंगाने शाळेतील आणखी दोन विद्यार्थी रियांश खडसे आणि आर्यन पिसे यांची जिल्हा क्रीडा अधिकारी बॅडमिंटन कोर्टमध्ये आयोजित बॅडमिंटन ट्रायलसाठी निवड करण्यात आली.

या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक पराग गावंडे, अक्षय लव्हाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल माननीय प्राचार्या मनीषा संगर मॅडम यांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले. व शाळेतील विद्यार्थ्यांना भविष्यातही होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

# वीजचोरी रोखण्याच्या महावितरणच्या प्रयत्नांना यश

## ५० लाख युनिटची वीज चोरी उघडकीस

मुंबई दि. ७ : वीजचोरी रोखण्याच्या महावितरणच्या मोहिमेचा भाग म्हणून राज्याच्या प्रत्येक झोनमध्ये सर्वाधिक वीज गळती असलेले २३० फीडर निश्चित करून केलेली कारवाई यशस्वी झाली आहे. केवळ तीन महिन्यात ५० लाख युनिटची वीजचोरी उघडकीस आली असून या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

महावितरणच्या प्रत्येक फीडरवर अनेक ग्राहक जोडलेले असतात. फीडरवरून दिली गेलेली वीज आणि संबंधित ग्राहकांच्या मीटरवर नोंद झालेला विजेचा वापर यांची पडताळणी करून वीजगळती निश्चित केली जाते. मुख्यतः वीजचोरीमुळे तूट वाढते. महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक झोनमधील सर्वाधिक वीजगळती असलेले फीडर्स निश्चित केले. त्यानंतर त्यांच्याशी जोडलेल्या घरगुती आणि औद्योगिक ग्राहकांच्या वीजवापरावर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रित केले.

संबंधित ग्राहकांच्या मीटरमध्ये अचूक रिडिंग येत आहे का, मीटरमध्ये फेरफार केला आहे का, कोठे आकडा टाकून वीजचोरी होत आहे का याची माहिती महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी काढली व कारवाई केली. परिणामी त्या त्या भागातील वीजचोरीला आळा बसला असून ५ दशलक्ष युनिटची वीजचोरी रोखली गेली आहे. महावितरणच्या घरगुती ग्राहकांपैकी बहुतांश ग्राहक हे शंभर युनिट वीज वापरणारे असून अशा पन्नास हजार ग्राहकांच्या एक महिन्याच्या वीजवापराएवढी ही वीज आहे.

महावितरणने वीजगळती रोखण्यासाठी आक्रमकपणे काम सुरू केले आहे. त्याचा भाग म्हणून फीडर्सपैकी वीज गळतीच्या बाबतीत टॉपर्स निश्चित करून कारवाई करण्याची रणनिती आखली. त्या त्या झोनमध्ये कार्यकारी अभियंता आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना निश्चित केलेल्या फीडर्सची जबाबदारी देण्यात आली. काही ठिकाणी पन्नास ते सत्तर टक्क्यांपर्यंत गळती होती. ती वीस टक्क्यांवर आणण्याचे उद्दीष्ट देण्यात आले. तर तीस टक्के ते पन्नास टक्के गळती असलेल्या फीडर्सची गळती पंधरा टक्क्यांवर आणण्याचे उद्दीष्ट देण्यात आले. पहिल्या तीन महिन्यात मिळालेल्या यशामुळे अधिकारी उत्साहित झाले असून ही मोहीम उद्दीष्ट गाठेपर्यंत पुढे चालू ठेवण्यात येईल.

महावितरणतर्फे सध्या थकित वीजबिलांच्या वसुलीबरोबरच वीजचोरी रोखण्यावर भर देण्यात आहे. त्या दृष्टीने विविध प्रकारचे प्रयत्न चालू आहेत. अधिक वीजगळती असलेले फीडर्स शोधून त्याबाबतीत कारवाई करण्याचा उपाय त्याचा भाग आहे.

# शेतकऱ्यांची गळ्यात फास घेऊन वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात धडक

## अधीक्षक अभियंता कार्यालयात दोन तास फासा आंदोलन

## नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील कृषी पंपाचा वीज पुरवठा सुरळीत करा



अमरावती दि.७ : नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील कृषी पंपाचा विज पुरवठा सुरळीत होत नसल्याने शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात अधीक्षक अभियंता दिलीप खानंदे शेतकऱ्यांनी गळ्यात फास घालून अनोखे आंदोलन केले.

रब्बी हंगामाच्या पिकांची पेरणी होऊन एक महिन्याचा कालावधी होत असून नांदगाव तालुक्यातील कृषी पंपाचे शेकडो रोहित्र बंद असल्याने शेतकऱ्यांच्या चना व गहू पिकाला पाणी पुरवठा न झाल्याने पिके सुकण्याच्या मार्गावर आहे. मांजरी म्हसला सातरगाव आडगाव या भागातील रोहित्र दोन वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे शेकऱ्यांचे पीक सुकून लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी विवंचनेत सापडला आहे. आधीच अतिवृष्टीने खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी कर्ज बाजारी झाला आहे. शेतात मुबलक पाणी असताना विज पुरवठ्या अभावी पिकाला पाणी मिळत नाही. वेळी अवेळी लाईन येते. तसेच सिंगल फेज लाईन अनेक महिन्यापासून मिळत नाही. शेकडो रोहित्र ओव्हरलोड असतांना वर्षानुवर्षे नवीन रोहित्र बसविण्यात आले नाही. इत्यादी समस्या घेऊन नांदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी विज वितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता खानंदे यांच्या कार्यालयात धडक देऊन अचानक शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी गळफास लावल्याने अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड तारांबळ उडाली होती. शिवसेनेचे संपर्क प्रमुख सुधीर सुर्यवंशी यांनी समजूत काढल्याने अनर्थ टळला गळ्यात फास घालून दोन तास ठिय्या आंदोलन केले. यावेळी लेखी पत्र दिल्या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी माजी जि प सदस्य अभिजित ढेपे यांनी आंदोलनात सहभागी होऊन मध्यस्थी केली. यावेळी सरपंच श्रीकृष्ण सोळंके, मनदेव चव्हाण, अक्षय राणे, हेमंत ढेपे, मनोज ढोके, पिंटू तुपट, गुणवन्त चांदूरकर, शुभम सावरकर यांचेसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# ५० कोटीच्या विकास निधीला मंजूरी

## आ. रवी राणांनी घेतली ना. गिरीश महाजनांची भेट



अमरावती,दि. ७ : आमदार रवी राणा यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांची भेट घेतली. यावेळी आ. रवी राणा व खा. नवनीत रवी राणा यांनी सूचविलेल्या प्रत्येकी २५ यानुसार ५० कोटी रूपयाच्या कामांना मान्यता दिल्याचा दावा करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, बडनेरा, अमरावती, धारणी, चिखलदरा, तिवसा, परतवाडा, अचलपूर,चांदुर बाजार आदी तालुक्यातील विविध गावांमध्ये यातून मुलभूत सोयी सुविधा होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. आज आमदार रवी राणा यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील गावागावात चांगले रस्ते, पूल, समाजमंदिरे, बाजारओटे, नाल्या, पथदिवे, सार्वजनिक शौचालये आदी विकासकामांसाठी निधीची मागणी केली होती. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी या सर्व मागण्यांची तात्काळ निधी मंजूर केला.

यावेळी आमदार रवी राणा यांच्यासमवेत जितू दुधाने,आशिष कावरे,हर्षल रेवणे,निलेश भेंडे,संदीप ससे,अरुनसिंग, अनुप खडसे आदी उपस्थित होते.

# बाबासाहेबांची वैज्ञानिक दृष्टी आत्मसात करून महाभारत निर्माण करण्याची गरज : ॲड. संजयकुमार गाडगे

(सागर सवळे)



चांदूरबाजार दि. ७ : बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समाज आज निर्माण झाला नाही ही खेदाची बाब असून आम्ही त्यांच्या विचारधारेला समजू शकलो नसल्याने त्यांचे शासनकर्ती जमात बनवण्याचे स्वप्न साकार करण्यात आम्ही असमर्थ ठरलो असून त्यांचा रथ आम्ही पुढे नेऊ शकलो नसल्याचे प्रतिपादन आपल्या अध्यक्ष भाषणातून नागपूर जिल्हा न्यायालयाचे एडवोकेट संजय कुमार गाडगे यांनी सहा डिसेंबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी चांदूरबाजार येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बालउद्यानामध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार बळवंत वानखडे, निळाताई भालेकर, सौ आशाताई वासनिक, पत्रकार विलास पंचभाई यांची उपस्थिती होती एडवोकेट संजय कुमार गाडगे पुढे बोलताना म्हणाले की इंग्रजांनी दीडशे वर्ष भारतीयांना गुलाम ठेवण्यासाठी सन १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली होती यासाठी त्यांना किती वर्षे लागले असेल तीच तयारी आज सुरू झाली आहे इंग्रज अमेरिकन जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांनी आपल्या बायकांना सोबत आणले नव्हते म्हणून त्यांनी त्यांची अनावरस अवलाद तयार करून ती भारतात सोडूनच ते परतले सम्राट अशोकाच्या भारताला विखंडित करून प्रथम ब्रह्मदेश, श्रीलंका नेपाळ भूटान अफगाणिस्तान व नंतर पाकिस्तान व बांगलादेश वेगळे केले त्यांची औलाद आता पुन्हा एकदा तीच सुरुवात करण्याची तयारी करत असेल तर काय करायचे? म्हणून त्यांनी दिलेल्या सवलती कायद्यापुढे सम्राट अशोकाचा महाभारत महत्त्वाचा असून त्यासाठी त्यांच्या गुलामगिरीतून प्रथम मुक्त होऊन मालक होणे आवश्यक असल्याचे महत्त्वपूर्ण प्रतिपादन केले.

**झाडे लावा झाडे जगवा**

# वासनेचा बाजार

हपापलेली श्वापदे ही, शिकार शोधत आहेत
ऊत आलाय वासनेला, बाजार रंगत आहे....

नाक्यावरील टवाळ पोर, नजरेनं ड़ीवचत आहेत
अहो !थोपवेंना लाळेला, पोरींवर गळत आहे....

बाटली रे पवित्रस्थानं, पलंग सजवत आहेत
अर्थ ना मज्जावाला, लज्जाच सांडत आहे....

निरागस मुकी जनावरे, सुद्धा फडफडत आहेत
काय म्हणावं मानवाला, राक्षस दिसत आहे...

किती ऊतावीळ त्यांना, मर्यादा कापत आहेत
सीमा न वेडेपणाला, खेळच वाटत आहे.....

क्षणिक सुखासाठी, विश्वास तुडवित आहेत
ग्रहन लागले सुखाला, संस्क्रूती रुसत आहे ....

खुला देहाचा पसारा, बेभान वेचत आहेत
सृष्टी घडनक्रियेचा, बाजार रंगत आहे....

● ईश्वरी (शितल), मुंबई